www.sgbauonline.com

AU–1217

# Bachelor of Performing Arts (B.P.A.) Part—III Examination
## MARATHI
## (Compulsory Language)
## Paper—II

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 70

सूचना :— सर्व प्रश्न सोडवा.

1. महात्मा गांधी यांची विद्यापीठीय शिक्षणाबाबतची भूमिका विशद करा.

किंवा

वऱ्हाडी बोलीचा पूर्वेतिहास विविध ग्रंथांच्या आधारे सिद्ध करा. 12

2. उच्चविद्याविभूषित वर्गातही अंधश्रद्धा असतात हे लेखकाने कोणकोणत्या उदाहरणांसह पटवून दिले आहे ?

किंवा

राष्ट्रीय उत्पन्नासाठी पंढरीनाथ पाटील यांनी कोणकोणत्या उपाययोजना या पाठात दिल्या आहेत ? 8

3. 'बन्सीधर ! तू आता कुठे रे जाशील ?' या पाठातील बन्सीची करूण कहाणी तुमच्या शब्दात सांगा.

किंवा

'अतिथी देवोभव !' या पाठात प्राणीप्रिय बैलांप्रती नायक-नायिकेच्या विशुद्ध भावनांचा आढावा घ्या. 12

4. 'घर' या पाठात आधुनिकीकरणाच्या या युगात बदलत्या कुटुंब व्यवस्थेचे चित्रण कसे आले आहे ?

किंवा

मारुती चितमपल्ली यांच्या पाठाच्या आधारे कुलु खोऱ्यातील बगळ्यांच्या शिकारीचे वर्णन करा. 8

5. कान्होपात्रांच्या विठ्ठलभक्तीतील आर्त भावना विशद करा.

किंवा

अनंत फंदी यांच्या फटक्यातील सद्सद्विवेकाचा परामर्श घ्या. 12

6. ना.घ. देशपांडे यांनी कोणकोणत्या प्रतिमांच्या साहाय्याने प्रिय सखीचे वर्णन केले आहे ?

किंवा

नारायण सुर्वे यांच्या 'धीर' या कवितेचा आशय स्पष्ट करा. 8

7. (अ) जाहिरात म्हणजे काय ? ते सांगून जाहिरातीचे महत्व व प्रकार सांगा.

किंवा

बातमी म्हणजे काय ते सांगून बातमी लेखणाचे तंत्र सांगा. 5



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

(ब) खालील अपठित उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा :—

आमच्या देशामध्ये भाषेच्या क्षेत्रात पहिली क्रान्ती करण्याचा प्रयत्न ज्या ज्ञानेश्वरांनी केला त्यांच्या नेवाश्याला काल रात्रीच मी गेलो होतो. आणि त्यानंतर आज मी येथे बोलतो आहे, म्हणून एक गोष्ट मला स्पष्ट केली पाहिजे. नेवाश्याला ज्ञानेश्वरांच्या नावाने विद्यालय काढण्याचा संकल्प कर्वेंनी केला आहे. सगळीकडे विद्यालये निघून राहिली आहेत. पण महाराष्ट्राचे खरे विद्यापीठ नेवाश्याला आहे. संस्कृतमध्ये ज्ञानाचा मक्ता सगळी विद्वान मंडळी घेऊन बसली होती. त्या विद्वानांच्या तावडीतून ज्ञानाला सोडवून मराठीत ज्ञानाचा पहिला वृक्ष ज्ञानेश्वरांनी नेवाश्याला लावला. महाराष्ट्राच्या इतिहासात लोकभाषेने ज्ञानभाषेचे पहिले पाऊल तेथे टाकले. आणि म्हणून नेवाश्यालाही एक आधुनिक ज्ञानदीप आता उभा राहतो आहे याबद्दल आपणा सर्वांना आनंद वाटला पाहिजे.

उच्च शिक्षणाच्या माध्यमाबाबत मी आपल्याला एक प्रश्न विचारू इच्छितो. मराठी भाषेतून उच्च शिक्षण देता येणार नाही असे आपण का म्हणतो ? आम्ही मोठ्या अभिमानाने सांगत असतो की, 'अमृतातेही पैजा जिंके' अशा प्रतिज्ञा करून रसिकांचे मन वळवीत ही भाषा ज्ञानाच्या दिशेने पावलामागून पावले टाकीत चालली आहे. मागतिला आतिकडचे काही समजणार नाही हे कसे ? खरे म्हणजे भाषा ही विचाराच्या पाठीमागे येत असते. भाषेचे खरे सामर्थ्य विचार व्यक्त करण्यात आहे. संशोधनाच्या क्षेत्रात नवे विचार आणण्याचा प्रयत्न करणारी माणसे जसजशी निर्माण होतील, वाढतील, तसतशी भाषा वाढत जाईल. नवे अनुभव आले, नवे काम वाढले, भाषा वाढली, पहिल्याने मोटारीची कल्पना आली, मग नंतर मोटार आली आणि त्या मोटारीबरोबर कितीतरी नवे शब्द आले. एक नवी परिभाषा आली. साखर-कारकाण्याबरोबर किती तरी नव्या कल्पना आल्या. नवीन जीवन आले. नवा विचार आला की भाषा नवे रंगरूप घेऊन आपल्यापाशी येते आणि तो विचार व्यक्त करण्याच्या प्रयत्नात ती स्वतःच संपन्न होऊन जाते. भाषेचे स्वरूप हे असे आहे.

वरील उताऱ्याच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

(1) आमच्या देशात भाषेच्या क्षेत्रात पहिली क्रांती करण्याचा प्रयत्न कोणी केला ? 1

(2) महाराष्ट्राच्या इतिहासात लोकभाषेने ज्ञानभाषेचे पहिले पाऊल कोठे टाकले ? 1

(3) भाषा कशी वाढत जाईल ? 1

(4) भाषेचे स्वरूप कसे असते ? 1

(5) वरील उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. 1

किंवा

वरील उताऱ्याचा सारांश लिहा. 5

टीप :— प्र. क्र. 7(ब) चा अपठित उतारा 'पूर्णिमाय' या पाठ्यपुस्तकातील यशवंतराव चव्हाण यांच्या 'लोकभाषा हीच ज्ञानभाषा' या पाठातून घेतला आहे. पान. नं. 5 व 6.



www.sgbauonline.com